अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. २६ जुलै २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २९७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# पुण्यात अक्षरशः आभाळ फाटले

## सोलापूरकरांवर चिंतेचे ढग दाटले

✔ पुणे/प्रतिनिधी

**पुण्यात बुधवारी (ता.२४) रात्रीपासून पावसाने अक्षरशः थैमान पर्यायाने धुमाकुळ घातला आहे. सततच्या पावसामुळे पुण्यातील अनेक भागात पाणी साचले आहे. त्यातच खडकवाला धरणाचं पाणी सोडल्याने परिसरात छातीपर्यंत पाणी भरले आहे. त्यामुळे लोकांना होडीच्या मदतीने बाहेर काढलं जात आहे. त्यामुळे नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. तर, पुण्यात येत्या काही तासात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. जणू आभाळ फाटल्याची स्थिती आहे.**

दरम्यान, पावसाच्या थैमानात विजेच्या धक्यानं तिघांचा दूर्देवी मृत्यू झाला आहे. तर मावळ तहसील येथील आदरवाडी गावात भूस्खलन झाल्याने एका हॉटेल कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. तर एक जण जखमी झाला आहे. पुराच्या पाण्यात अडकलेल्या १६० लोकांना रेस्क्यू टीमने पुरातून सुखरुप बाहेर काढले आहे.

घरात पाणी शिरल्यानं हजारो लोक बेघर झाले आहेत. मदत कार्यासाठी वेगवेगळी पथकं कार्यरत करण्यात आली आहेत. पावसापाण्यानं भयभीत झालेले लोक जीव मुठीत घेऊन आलेल्या परिस्थितीला सामोरे जात आहे. पुण्यातील पावसाच्या थैमानाच्या आणि निर्माण झालेल्या बेहाल परिस्थितीनं सोलापूरकरांच्या जीवाचा घोर वाढला आहे. त्यांच्यामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

कारण सोलापूर शहर जिल्ह्यातील हजारो कुटुंबिय व्यावसाय, धंदा आणि नोकरीच्या निमित्ताने पुण्यात विविध ठिकाणी वास्तव्याला आहेत, त्या कुटुंबियांच्या सोलापूर शहर-जिल्ह्यातील नातेवाईकांच्या जीवाला चिंता लागून राहिले आहे.

### डेक्कनसह अन्य परिसर पाण्यात

खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये ४०००० क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे मुठा नदीला पूर येऊन डेक्कन, सिंहगड रोड, एकता नगर, पूलाची वाडी या भागात पाणी शिरलं. अचानक पाणी वाढल्याने नागरिक घरातच अडकून पडले. आता त्यांना होडीच्या मदतीने बाहेर काढलं जात आहे.



पुणे : पाण्यातून नागरिकांना बाहेर काढताना लष्कारातील जवान.

### सोलापूरकर प्रसारमाध्यमांच्या संपर्कात; पुण्यातील संबंधितांना फोन वर फोन...

पुण्यात पावसाने थैमान घातलं आहे. परिणामी जनजीवन विस्कळीत झाले आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील जे लोक पुण्यात राहात आहेत. त्यांच्या ख्यालीखुशालीबद्दल शहर –जिल्ह्यातून नातेवाईकांकडून सतत फोन सुरु आहेत. शिवाय पुण्यातील पुरस्थिती आणि विस्कळीत झालेले जनजीवन याबाबतीत अधिक माहिती मिळवण्यासाठी सोलापूर जिल्हावासिय प्रसारमाध्यमांच्या संपर्कात राहात आहेत.

### लष्काराच्या तुकड्यादेखिल मदत कार्यात...

पुण्यात मुसळधार पावसामुळे अग्निशमन दलाचे २०० हून अधिक जवान आणि अधिकारी शहरातील विविध भागात तैनात करण्यात आले आहेत. सखल भागात असलेल्या घरं आणि इमारतींमध्ये अडकलेल्या सुमारे १६० लोकांना अग्निशमन दलाने सुखरुप घराबाहेर काढून सुरक्षितस्थळी हलवलं आहे. एनडीआरएफच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंहगड रोड परिसरातील एकता नगरमध्ये पाणी साचल्याने अनेक लोक घरात अडकले आहेत, या नागरिकांसाठी एनडीआरएफची दोन पथकं रवाना करण्यात आली आहेत.प्रशासनाच्या विनंतीवरुन तळेगाव येथील एनडीआरएफच्या पाचव्या बटालियनकडून पथकं पाठवण्यात आली आहेत. पुण्यातील वारजे परिसरात एनडीआरएफची तिसरी टीम तैनात करण्यात आली आहे. पूरग्रस्त भागात अडकलेल्या स्थानिक लोकांना वाचवण्यासाठी एनडीआरएफ आणि भारतीय लष्कराचं पथक पुण्यातील एकता नगरमध्ये मदतकार्य सुरू आहे.



पुणे : भयावह पाण्यातून बाहेर निघताना पुणेकरांची उडालेली त्रेधातिरपीट.

### थेट पुण्यातून...

- २४ तासात तब्बल ३७० मिलीमीटर पाऊस
- अवघ्या चार तासात झाले होत्याचे नव्हते
- दहावी, बारावीचे पेपर ढकलेले पुढे
- तुफान पावासाचा रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम
- सहा एक्स्प्रेसह ६० लोकल फेऱ्या रद्द
- काम असेल तर घराबाहेर पडण्याचं पालकमंत्र्यांचं आश्वासन
- दिवसा नदीत पाण्याचा विसर्ग सोडण्याच्या सूचना
- हजारे दूचाकी आणि चारचाकी पाण्यात
- मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री पवार परिस्थितीवर लक्ष ठेवून
- पूर्वसुचना न देता जादा पाणी सोडायला लावून गंभीर परिस्थिती आणल्याचा अजित पवारांवर नागरिकांना आरोप
- अजित पवारांकडून आरोपांचा स्पष्ट शब्दात इन्कार

### पाण्याचा विसर्ग आणखी वाढणार

पुण्यात अनेक ठिकाणी छातीपर्यंत पाणी साचले आहे, जर विसर्ग असाच सुरु राहिला तर परिस्थिती अजून भीषण होऊ शकते. म्हणून पुणे महापालिकेने जलसंपदा विभागाला पाण्याचा विसर्ग कमी करण्याची विनंती केली. पण, शहरात मुसळधार पाऊस कोसळतो आहे, त्यामुळे पाण्याचा विसर्ग कमी करण्याऐवजी तो आणखी वाढवावा लागेल असं जलसंपदा विभागाने सांगितल्याची माहिती आहे. त्यामुळे पुण्यातील परिस्थिती आणखी भीषण होण्याची भीती आहे.



पुणे : रस्त्यावरील पाण्यात आडकलेल्या कार. दुसऱ्या छायाचित्रात पाण्यातून लहान मुलांसह महिलांना सुरक्षित स्थळी पोचविताना कुटुंबप्रमुख.

- ✔ आणखी होवू शकते परिस्थिती बिकट
- ✔ जिल्हाधिकाऱ्यांचा सतर्कतेचा इशारा
- ✔ प्रसंगी एअरलिप्ट करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश
- ✔ १६० जणांना पुरातून बाहेर काढण्यात यश
- ✔ विजेच्या धक्क्याने तिघांचा तर पाण्यात एकाचा मृत्यू
- ✔ प्रशासनाच्या तोंडचं पळालं पाणी
- ✔ संपूर्ण जनजीवन विस्कळीत
- ✔ हजारोजणांचे संसार पाण्यात
- ✔ महिलांचा आर्त टाहो
- ✔ हृदय पिळवटून टाकणाऱ्या मदतीसाठीच्या याचना
- ✔ हंबरडा फोडून हजारो जनावरे जागीच गतप्राण

### पानी रे पानी तेरा रंग कैसा...



पुणे : पाण्याची पातळी वाढल्याने यामध्ये अशा चारचाकी गाड्याही वाहत आल्याचे चित्र राहिले.


# भीमेला येणार पूर : नदीकाठी सतर्कतेचा इशारा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

दौंडमधून उजनी धरणात येणारा पाण्याचा विसर्ग गुरूवारी पुन्हा वाढला आहे. रात्रीच्या आकडेवारीनुसार ९८ हजार क्युसेकचा विसर्ग धरणात येत होता. शुक्रवारी यात पुन्हा वाढ होण्याची शक्यता उजनी व्यवस्थापनाकडून वर्तवण्यात आली आहे. दरम्यान वीर धरणातून नीरा नदीत ६५ हजार क्युसेकचा विर्सग सोडण्यात आल्याने भीमा नदीला पूर येण्याची शक्यता आहे.दौंडमधून विसर्ग वाढल्याने उजनी शुक्रवारी प्लसची (उपयुक्त पातळी) बॉन्ड्री पार करून पुढे सरकणार आहे.

पुणे,पिंपरी चिंचवड या शहरांमध्ये पावसाचा हाहाकार झाला आहे. पवना,मुळा नदीकाठचा परिसर जलमय झाला आहे तसेच उजनीच्या पाणलोट क्षेत्रातही संततधार पाऊस पडला आहे.परिणामी दौंडमधून पाण्याचा विसर्ग वाढला आहे. गुरूवारी सायंकाळी केवळ २२ हजार क्युसेकचा विसर्ग होता. शुक्रवारी त्यात वाढ झाली. एका दिवसात ५८ हजार क्युसेकने वाढ झाली.यावरून पुणे शहर व जिल्ह्यातील पावसाचा धुमाकूळ लक्षात येतो.

खडकवासला धरणातून पाणी सोडल्यामुळे मुठा नदीला पूर आला आहे तसेच पिंपरी चिंचवडसह मावळ, मुळशी परिसरामध्ये दिवसभर अतिवृष्टी सुरू होती. त्यामुळे धरण साठ्यात वेगाने वाढ झाली. पवना आणि मुळा नदीची पाणी पातळी वाढली.खडकवासला धरणातून



शुक्रवारी सायंकाळी ४० हजार क्युसेकने विसर्ग वाढवण्यात आला तर दुपारपासून पवना धरणातून १४००, मुळशीतून साडेपाच हजार क्युसेक विसर्ग वाढवला गेला.

### धरण आज उपयुक्त पातळीत

पुणे आणि सोलापूर जिल्ह्यात पावसाला सुरूवात झाल्यानंतर उजनीच्या पातळीकडे सोलापूर जिल्हावासियांचे लक्ष लागून होते. गुरूवारी सायंकाळी धरणातील पाण्याची पातळी वजा १७ टक्के होती. दौंडमधून विसर्ग वाढल्यानंतर शुक्रवारी एका दिवसात पाण्याची पातळी वजा १० टक्के झाली.

- ▸▸ दौंडमधून उजनीत ९८ हजार तर वीरमधून नीरेत ६५ हजार क्युसेकचा लोंढा.
- ▸▸ सोलापूरची वरदायिनी आज प्लस सीमारेषा ओलांडून पुढे सरकणार

**उजनीला अजून फायदा :** गेल्या तीन दिवसांपासून सलगपणे पिंपरी –चिंचवड आणि मावळ, मुळशी परिसरामध्ये जोरदार पाऊस सुरू होता. शुक्रवारी दुपारी एक वाजता मुळशीतून २५०० आणि पवनातून १४०० क्युसेक पाणी सोडले. सायंकाळी मुशीतून पाच हजार क्युसेक पाणी सोडले आहे. संततधार पावसामुळे इंद्रायणी नदीच्या पाणी पातळीतही वाढ झाली आहे. पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र आळंदी देवाची येथील इंद्रायणी नदी धोकादायक पातळीवरून वाहत आहे. धरणांमधून सोडलेले पाणी आणि इंद्रायणी नदीतील पाणी थेट भीमा नदीत येणार आहे.त्यामुळे उजनीला अजून पाण्याचा लाभ होणार आहे.

# खंडाळीत महिला बचत गट सचिवाचा मान तृतीय पंथीयास

## ‘सोच बदलो; सब कुछ बदल जायेगा’ स्लोगनचा प्रत्यय

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**ज्यांच्यावर नुसती नजर गेली तरी समाजामधील बहुतांश सर्वजणांची नाकं डोळं मुरडली जातात...डोळ विस्फारले जातात...कपाळावर आपोआप आठ्या पडतात...अहो, एवढंच काय तर ते दिसले तरी कित्येकजण ना पसंतीनं मान फिरवतात...तसं तर समाजानंच त्यांच्याकडं पाठ फिरवलेली असते...त्यांच्याकडे पाहणं टाळतो...ज्यांच्या टाळी बडवण्यानं सत्यनाश होतो असं भ्रम निर्माण होण्यातून त्यांच्याबद्दल अत्यंत तिटकारा येतो...शिवाय ज्यांच्याबद्दल अनामिक भिती वाटते...जे बऱ्याच टिंगलीचा विषय ठरतात...एकूणच समाजाची ज्यांच्याबद्दल दृष्टीच वेगळी होऊन गेलेली... जे समाजातून बहिष्कृत असतात...असेच कोणी माणसात येत असतील अन् त्यांना माणूस म्हणून सामावून घेतले जात असेल तर....हो! अगदी तसंच माळशिरस तालुक्याच्या ग्रामीण भागात पुन्हा घडलंय...समाज परिवर्तनाची नांदी यातून पुन्हा दिसून येतेय...इतकंच काय तर ‘सोच बदलो, सब कुछ बदल जायेगा’ हे स्लोगन यातून तंतोतंत लागू पडलंय.**

- ✔ तृतीय पंथी सूरज कांबळे बनला बचत गटाचा कारभारी
- ✔ माळशिरसला सामाजिक परिवर्तनाच्या नांदीचा पुन्हा झेंडा



खंडाळी : दुर्गा बचत गटाच्या सचिवपदी निवड झाल्याबद्दल सुरज कांबळे याचा सन्मान करताना रणजित शेंडे, शिवाजी शेंडगे आदी.

“ आम्हा तृतीयपंथीयांच्या बाबतीत समाजाची दृष्टी खूप वेगळी आहे. त्यातून आम्हाला सन्मानाने कोठेच सामावून घेतले जात नाही. सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना काढली, त्यामध्ये मागणी करुनदेखील आम्हा सर्व तृतीयपंथीयांना सामावून घेण्याचा निर्णय झाला नाही. अशात आमच्या गावातील दूर्गा बचत गटाच्या महिलांनी मला सामावून तर घेतले. सचिव पद देऊन सन्मानित केले. मला याचे खूप वेगळे समाधान आणि आनंद आहे.

**–सूरज कांबळे, तृतीय पंथी तथा सचिव, दूर्गा महिला बचत गट, खंडाळी (ता, माळशिरस)**

ज्या माळशिरस तालुक्यानं गावचं कारभारपण एका तृतीय पंथीयाच्या हाती दिला, सामाजिक परिर्वतनाच्या नांदीचा चत्मकार घडवून आणला, त्याच तालुक्यानं पुन्हा एकदा समाज परिवर्तनाचा अटेकपार झेंडा फडकावला. सहकार क्षेत्राची गंगा वाहणाऱ्या माळशिरस तालुक्यातील खंडाळी या गावात अशी किमया घडली आहे. गावात सर्वांना परिचित असलेल्या सूरज कांबळे या तृतीय पंथीयाला इथल्या महिला बचत गटात सामावून घेण्यात आलंय. नुसतं सामावून नाही तर बचत गटामधील सचिवपद त्याला मोठ्या सन्मानानं बहाल केले आहे. त्याच्या या सन्मानीय निवडीची माळशिरस तालुक्यात चर्चा रंगली आहे. तृतीय पंथीयांना सन्मानाने आयुष्य जगण्यासाठी रेशनकार्ड, आधारकार्ड, रहिवास दाखले मिळू लागले आहेत. त्यांचं समाजात स्थान पक्के होऊ लागले आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ‘उमंग लोक’ संचलित, खंडाळी गावच्या दुर्गामाता महिला बचत गटाच्या सचिवपदी सूरज कांबळे या तृतीय पंथीयाची एकमताने निवड होताच महिला आर्थिक महामंडळाचे तालुका कार्यक्रम अधिकारी रणजित शेंडे, उमंग लोक संचलित साधन केंद्राचे व्यवस्थापक शिवाजी शेंडगे, दुर्गामाता महिला बचत गटाच्या अध्यक्षा शाबेरा शेख आदींनी सूरज कांबळे यांचा सत्कार केला.

### सन्मानाचा दुहेरी षटकार

माळशिरस तालुक्यात यापूर्वी तरंगफळ गावच्या सरपंचपदी ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली कांबळे या तृतीय पंथीयाची थेट सरपंचपदी निवड झाली होती. त्यानंतर एखाद्या महिला बचत गटात तृतीय पंथीयांना सामावून घेणे आणि त्यात सचिवपदी तृतीय पंथीयाची निवड होणे, ही आणखी आश्वासक बाब मानली जात आहे. तृतीय पंथीयास पहिल्यांदा सरपंचपद आणि दुसऱ्यांदा बचत गटाचे सचिवनद असा सन्मानाचा दुहेरी षटकार तृतीय पंथीयाच्याबाबतीत माळशिरस तालुक्याने मारला आहे.

---

### ‘सरकारने सन्मान केला नाही म्हणून आम्ही केला’

विधान सभा निवडणुकीचं गणित घालत मध्य प्रदेश सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्रात माझी लाडकी बहीण योजना सरकारने जाहीर केली. बहिणचं झालं, आत्ता भावाचं काय? अशी चर्चा सुरु झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्यापाठोपाठ माझा लाडका भाऊ योजनाही जाहीर केली आहे. लाडकी बहीण योजानेसाठी लाखो महिलांचे अर्ज भरले जात आहेत. परंतु, अशा योजनांमध्ये तृतीय पंथीयांना संधी मिळाली नाही. त्याची चर्चा खंडाळी गावात महिला बचत गटात उपस्थित झाली आणि त्यातून बचत गटात तृतीय पंथीयांना सामावून घेण्याचा विचार समोर आला. त्यातून सूरज कांबळेला बचत गटात सामावून घेऊन त्याला सचिवपद देण्यात आल्याचे दुर्गामाता बचत गटाच्या अध्यक्षा शाबेरा शेख यांनी सांगितले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



महागड्या मोबाईल रीचार्जवर उपाय शोधलाय!

कल्याण
346-31-560

मुंबई
125-82-778